# जाहीरात

महाराष्ट्र शासन, अल्पसंख्याक विभाग यांचेकडील शासन निर्णय क. उघव्य२०१६/प्र.क्र.१९/कार्या-४, दि. २१ जुलै २०१६ अन्वये उर्दू घराच्या व्यवस्थापनासाठी व्यवस्थापक हे पद उपविभागीय अधिकारी, सोलापूर क. १. सोलापूर या कार्यालयामार्फत निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्त्वावर ११ महिन्याचे कालावधीकरिता भरती करावयाचे आहे. सदर पदा करिता विहित केलेल्या अर्हतेनुसार पात्र उमेदवारांनी दि. २४/०४/२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वा. पर्यंत उपविभागीय अधिकारी, सोलापूर क्र. १ सोलापूर येथे लेखी अर्ज, कागदपत्रांचे छायांकित साक्षांकित प्रतीसह सादर करावेत.

भरावयाचे पदे खालील प्रमाणे-

| अ.क्र. | पदनाम | पद संख्या | अर्हता | मासिक मानधन (रु.) |
|---|---|---|---|---|
| १ | व्यवस्थापक | १ | १) उर्दू घरांच्या व्यवस्थापनासाठी उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे कर्मचारी वर्ग कंत्राटी पध्दतीने भरण्यात येत आहे.<br>२) राज्य शासनाच्या / निमशासकीय सेवेतून किमान राजपत्रित वर्ग-ब किवा तत्सम पदावरुन सेवानिवृत्त झालेले असणे आवश्यक आहे. (सेव निवृत्त अधिकारी, अध्यापक<br>३) संबंधित उमदेवार यांना उर्दू भाषा लिहिता / वाचता / बोलता येणे आवश्यक राहील.<br>४) कमाल वयोमर्यादा ही ७० पेक्षा जास्त नसावी.<br>५) सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.<br>६) नियुक्त करण्यात येणारे अधिकारी / कर्मचारी याच्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी व तो त्याच्यावर सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यवसायिक कामात गुंतलेला नसावा,<br>(७) उमेदवाराने Conflict interest अर्जासोबत जाहीर करणे आवश्यक राहीन<br>८) उमेदवाराला उर्दू भाषा विकासासाठी नाविन्यपूर्ण उपक्रमाचा अनुभव असणे आवश्यक<br>९) विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील. | ३५,०००/- |

तरी अर्जाची आवश्यक अर्हता तपासून मुलाखती घेतल्या जातील. मुलाखत घेऊन उर्दू घराचे व्यवस्थापनासाठी पात्र उमेदवाराची निवड केली जाईल. सदर पद भरती बाबतचे सर्व अंतिम अधिकार/निर्णय मा. जिल्हाधिकारी सोलापूर यांना राहतील. मुलाखतीच्या वेळेसाठी उमेदवारांनी उपविभागीय अधिकारी सोलापूर क्रमांक १. सोलापूर, जुने जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सिध्देश्वर पेठ, सोलापूर यांचे कार्यालयाच्या नोटीस बोर्ड व सोलापूर जिल्हयाच्या Solapur.nic.in या संकेत स्थळावर पहावे. कागदपत्रांसह अर्ज सादर करण्याचा अंतिम दि. २४/०४/२०२६ रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत आहे.

स्थळ : सोलापूर

दिनांक : 08/04/2026
08/04/2026

मा. जिल्हाधिकारी सो.
यांचे मान्यतेने

(सुमित शिंदे)
प्र. उपाध्यक्ष - उर्दू घर सांस्कृतिक समिती तथा
उपविभागीय अधिकारी सोलापूर क्र.१ सोलापूर